महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/मावक/३११४१
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : managerbcrrc@gmail.com
Website : www.mahadiscom.in

**दिनांक : २०/१२/२०१७**

# परिपत्रक

**विषय :** शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार दिलेल्या तदर्थ नियुक्त्यांना मा. उच्च न्यायालयाच्या दि. १०.११.२०१७ च्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९५ दि. ३१.०७.२०१४.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५०४ दि. ०७.०४.२०१५.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३४ दि. ०४.०४.२०१६.
४) परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२७५९६ दि. १३.११.२०१७.
५) सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब, दि.०२.१२.२०१५.
६) सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३/१६-ब, दि.१७.०५.२०१७
७) सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३/१६-ब, दि.०९.११.२०१७
८) सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३/१६-ब, दि.०२.१२.२०१७

-----------------

महावितरणमध्ये 'विद्युत सहाय्यक' या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता ०३ वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने निवड करण्याकरिता जाहिरात क्र. ०५/२०१४ ही माहे ऑगष्ट २०१४ मध्ये दिलेली होती. त्यास अनुसरुन काही उमेदवारांनी ईएसबीसी प्रवर्गातून अर्ज सादर केले होते. तथापि, महाराष्ट्र शासन निर्णय दि. २१.०२.२०१५ अन्वये नमूद केल्याप्रमाणे ईएसबीसी आरक्षणासंबंधीची रिट याचिका क्र. ३१५१/ २०१४ मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने काही ईएसबीसी उमेदवारांनी सदर जाहिराती अंतर्गत निवड होण्याकरिता औरंगाबाद खंडपीठाकडे याचिका क्र. ५२९०/२०१७ व इतर संलग्न याचिका दाखल केल्या होत्या. त्यास अनुसरुन महावितरण कंपनीकडून घेतलेल्या निर्णयानुसार "ज्या उमेदवारांचे सरासरी गुण प्रतिक्षा यादीतील खुल्या प्रवर्गाच्या शेवटच्या उमेदवारापेक्षा (६७.५४% व त्यापेक्षा जास्त) असतील तसेच जाहिरातीस अनुसरुन दि. ३०.०९.२०१४ रोजी कमाल वयोमर्यादा २७ वर्षे असेल अशा उमेदवारांनी निवड करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

२. मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३१५१/२०१४ वर दि. ०७.०४.२०१५ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार तदर्थ नियुक्त्या दि. ०३ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यासंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले होते. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या जनहित याचिका क्र. १४९/२०१४ यामध्ये शासनाने दाखल केलेल्या दिवाणी अर्ज क्र. १०४/२०१७ वर मा. उच्च न्यायालयाने दि. १०.११.२०१७ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार संदर्भीय शासन निर्णय क्र. ८ अन्वये खालीलप्रमाणे सुधारीत आदेश दिलेला आहे.

> "मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०७.०४.२०१५ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार देण्यात आलेल्या व दि.०४.०५.२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार दि. ०३.११.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यात आलेल्या तदर्थ स्वरुपातील नेमणुका, मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दि. १०.११.२०१७ च्या अंतरिम आदेशानुसार दि. ०३.११.२०१७ पासून पुढील सहा महिने म्हणजेच दि. ०३ मे, २०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे."

३. सदर शासन निर्णयातील सूचना/तरतुदीची काटेकोरपणे पालन होण्यासाठी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी दि. ०२ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे व सदर निर्णयातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या इन्ट्रानेटवर (RAPDRP Portal) उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(संदेश हाके) २०/१२
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

C:\Users\Administrator\Desktop\ESBC.docx